# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

प्रकल्प प्रवर्तक दि. माळेगाव सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मु. पोस्ट. शिवनगर, ता. बारामती, जिल्हा -पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित ऊस गाळप क्षमता ४००० मे.टन प्रतिदिन ते ८२५० मे.टन प्रतिदिन (४२५० मे.टन प्रतिदिन) विस्तारिकरण व सहवीजनिर्मिती प्रकल्प २१ मेगावॉट ते ३५ मेगावॅट करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत

प्रकल्प प्रवर्तक दि. माळेगाव सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मु. पोस्ट. शिवनगर, ता. बारामती, जिल्हा -पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित ऊस गाळप क्षमता ४००० मे.टन प्रतिदिन ते ८२५० मे.टन प्रतिदिन (४२५० मे.टन प्रतिदिन) विस्तारिकरण व सहवीजनिर्मिती प्रकल्प २१ मेगावॉट ते ३५ मेगावॅट विस्तारिकरण करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०४ डिसेंबर, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१०५ /२०१८,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी - ४४६५, दि.२६-११-२०१८ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१. डॉ. सौ. जयश्री कटारे, - अध्यक्ष
मा.अप्पर जिल्हादंडाधिकारी -पुणे
(मा. जिल्हादंडाधिकारी,पुणे यांचे प्रतिनिधी)

२. श्री नितीन शिंदे, - समन्वयक
उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१
मप्रनि मंडळ, पुणे.

श्री नितीन शिंदे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१, मप्रनि मंडळ, पुणे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. शिंदे यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-१, मप्रनि मंडळ, पुणेयांनाप्रकल्प प्रवर्तक दि. माळेगाव सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मु. पोस्ट.

शिवनगर, ता. बारामती, जिल्हा -पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ४००० मे.टन प्रतिदिन ते ८२५० मे.टन प्रतिदिन (४२५० मे.टन प्रतिदिन) विस्तारिकरण व सहवीजनिर्मिती प्रकल्प क्षमता विस्तार २१ मेगावॉट ते ३५ मेगावॅट विस्तारिकरण करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीआयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ५ (जे) व १ (डी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

समन्यवयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी माहिती दिली भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचनेप्रमाणे ऊसगाळप क्षमता ५,००० टीसीडी पेक्षा जास्त असणारा प्रकल्प/उद्द्योग संवर्ग "ब" व सहवीज प्रकल्प संवर्ग "ब" मध्ये समाविष्ट आहे. त्याअनुषंगाने प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयास प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ११.०५.२०१८ रोजी सादर केला व त्यास अर्जास मंजूरी दिनांक ११.०७.२०१८ रोजी महाराष्ट्र सरकार पर्यावरण विभाग प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-१, मप्रनि मंडळ, पुणे यांनी स्थानिक वृत्तपत्र दै. लोकसत्ता मराठीत दि. ०१.११.२०१८ व इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये दि. ०१.११.२०१८ रोजी जाहिर सुनावणीची सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा सुनावणीच्या वेळी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम विभाग कार्यालय, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-पुणे, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पुणे,जिल्हा-पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, पुणे, तहसीलदार- तालुका कार्यालय- बारामती, जिल्हा - पुणे , गटविकास अधिकारी- पंचायत समिती, बारामती, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे, ग्रामपंचायत कार्यालये - खांडज, पाहुणेवाडी, माळेगाव बु, माळेगाव खुर्द, धुमाळवाडी, तालुका- बारामती, जिल्हा - पुणे, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी

सांगितले की वरिल प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-१ यांना एक सूचना ईमेलव्दारे प्राप्त झालेली असून संबंधित व्यक्तीचा विस्तारिकरणास पाठिंबा आहे. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. समन्वयक श्री शिंदे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

सौ. जयश्री कटारे, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

**खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला व त्यांच्या प्रश्नांना/सूचनांना देण्यात आलेली उत्तरेः-**

१. **श्री. सोपानराव तुकाराम आटोळे, मु.पोस्ट. खांडज, ता.बारामती, जिल्हा- पुणे.**

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| १ | कारखाना विस्तारवाढीनंतर परिसरातील हवामानावर, पिकांवर, जनावरांवर इ. प्रदूषणामुळे विपरीत परिणाम होईल का ? | कारखान्याचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल साठी जे मॉडेलिंग केले आहे त्यामध्ये हवेतील प्रदूषक मध्ये थोडीशी वाढ होऊ शकते. परंतु हि वाढ व सध्याची प्रदूषकांची वाढ, यांचा दोन्हींचा विचार केला तर साधारणतः ७६.५२७ मायक्रोग्रॅम इतकी वाढ ( धूलिकण / प्रदूषके ) दिसते. म्हणजेच ज्यावेळी विस्तारवाढ होईल त्यावेळी प्रदूषकांची / धूलिकणांची मात्रा संभावित आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी जे मार्गदर्शक तत्वे / सूचना दिलेल्या आहे त्यानुसार धूलिकणांची मात्र १०० मायक्रोग्रॅम पेक्षा कमी पाहिजे. धूलिकणांची मात्रा विस्तारवाढीनंतर ७६.५२७ मायक्रोग्रॅम इतकी असण्याची संभावना आहे जिकी प्रदूषण निकषांच्या मर्यादेत असल्यामुळे हवेतील प्रदूषणावर कोणताही परिणाम होणार नाही.<br>तसेच सल्फर डाय ऑक्साईड हे २३.२३ मायक्रोग्रॅम इतकी असणार आहे. |
| | तसेच कारखाना विस्तारवाढीमुळे आर्थिक सुधारणा वा उन्नती होईल का? | कारखाना विस्तारवाढीनंतर कार्यक्षेत्रातील ऊस वेळेत व लवकर गाळप होईल व सभासदांना त्याचा फायदा होईल. तसेच विस्तारवाढीनंतर जे जास्तीचे उद्पादन जसे साखर, वीज, मळी इ. च्या विक्रीतून शेतकरी व सभासदांना फायदा होईल. |

२. श्री. श्रीहरी पांडुरंग येळे मु. येळेवस्ती, माळेगाव बु. ता. बारामती, जिल्हा -पुणे.

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| २ | कारखाना विस्तारवाढीनंतर काही सामाजिक सुधारणा होईल का ? | कारखाना विस्तारवाढीमुळे कारखान्यास सध्या लागणाऱ्या ऊस तोडणी यंत्रणेच्या दुप्पट तोडणी यंत्रणा लागणार आहे. त्यामुळे ऊस तोडणी मजुरांना रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच विस्तारवाढीनंतर कारखान्यात १६३ नवीन कामगार लागणार आहे. कारखाना विस्तारवाढीनंतर लागणारे कामगार हे कारखाना परिसरातील घेणार आहोत. तसेच स्थानिक कंत्राटदार व स्थानिक मजुरांना रोजगार उपलब्ध होणार आहे, त्यामुळे सामाजिक सुधारणा होईल.<br>कारखान्याच्या माध्यमातून चालविले जाणारे कार्यक्रम जसे शाळा, महाविद्यालय, इ. सुविधांचा लाभ परिसरातील सर्वांना होत आहे. |

३. श्री. किशोरसिंह कृष्णसिंह जाधवराव, मु. पोस्ट. माळेगाव बु., ता. बारामती, जिल्हा - पुणे

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ३ | सहकारी साखर कारखान्याची विस्तारवाढ झाल्यावर जो रोजगार उपलब्ध होईल त्यामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे. | सहकारी साखर कारखानदारी मध्ये विशेषतः स्थानिक लोकांना प्राधान्य दिले आहे, सध्या एकूण रोजगाराच्या ९० % रोजगार हा स्थानिकांना दिला आहे व तसेच हेच धोरण पुढेही राबिविले जाईल. काही तांत्रिक बाबीसाठी अपवादात्मक परिस्थिती बाहेरील लोकांना रोजगार दिला जातो. |

४. श्री. संदीप विठ्ठलराव घोरपडे मु. पोस्ट. माळेगाव बु, ता. बारामती, जिल्हा - पुणे.

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ४ | कारखाना करीत असलेल्या विस्तारवाढीमुळे कार्यक्षेत्रातील शेती पिकांवर काही परिणाम होईल का ? आणि सध्या असा कोणताही परिणाम आढळत नाही. | कारखाना विस्तारवाढ करतांना जल व वायू प्रदूषण होणे संभाव्य आहेत. त्यामध्ये वायुप्रदूषणात जी वाढ होणार आहे ती वाढ हि राष्ट्रीय गुणवत्ता निकषाच्या मर्यादेत आहे. त्यामुळे वायू प्रदूषणाचा शेती व पिकांवर परिणाम होणार नाही.<br>ई.टी.पी. द्वारे केली जाणारी सांडपाणी प्रक्रिया हि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार (सूचना) व निकषानुसार केली जाणार आहे. त्यामुळे जल प्रदूषणाचा शेती व पिकांवर परिणाम होणार नाही. |

५. श्री.विक्रम जगताप मु.पोस्ट.- पणदरे, ता. बारामती, जिल्हा- पुणे .

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ५ | कारखान्यामध्ये साखर निर्मिती करतांना प्रोसेस मध्ये गंधकाचा वापर केला जातो, त्याचा मानवाच्या आरोग्यावर परिणाम होईल का ? | भारतामध्ये साखर निर्मितीसाठी डबल सल्फेटेशन या प्रक्रियेने साखर निर्मिती केली जाते. तसेच अन्न व औषधी नियंत्रण मंडळ यांच्या नियम व अटीनुसार साखरेमध्ये गंधकाचे प्रमाण किती असले पाहिजे त्यावर निर्बंध घातले आहे. कारखाना एन.ए.बी.एल. मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून साखरेमध्ये गंधकाचे प्रमाण व गुणवत्ता वेळोवेळी तपासणी केली जाते. त्यामुळे मानवी आरोग्यावर कोणताही परिणाम संभवत नाही. |

६. श्री. हेमंत काटे, मु. माळेगाव, ता.बारामती, जिल्हा -पुणे.

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ६ | कारखाना कार्यक्षेत्र चा जो नकाशा दाखवला आहे, त्यानुसार कारखाना कार्यक्षेत्रात ८० % उसाचे पीक घेतले जाते त्यामुळे कारखाना विस्तारवाढ करणे गरजेचे आहे, कारखान्यांमधून होणाऱ्या वायू प्रदूषण यासाठी कारखान्याने ई.एस.पी. बसवला असल्याने वायू प्रदूषण होत नाही, तसेच ई.एस.पी. जी चिमणी (स्टॅक) आहे तिची उंची हि ७६ मीटर आहे.<br>कारखाना विस्तारवाढीस पाठींबा दर्शिविला आहे. | आपण दर्शिवलेल्या पाठिंब्यासाठी धन्यवाद. |

७. श्री. एच. मधू बाबू , हैद्राबाद , पर्यावरण विषयक सामाजिक कार्यकर्ते.

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ७ | पर्यावरण विषयक सामाजिक कार्यकर्ते सदर प्रकल्पास | त्याची नोंद कारखाना व्यवस्थापनाने |

| | | |
|---|---|---|
| | आपले समर्थन असल्यास सांगितले व काही सूचना लेखी स्वरूपात निवेदन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे -१ यांच्याकडे दिले आहे. | घेतली. |

**८. श्री. नानासाहेब दाजीराम मोकाशी मु.पोस्ट.- पाहुणेवाडी, ता.बारामती, जिल्हा- पुणे.**

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ८ | कारखाना विस्तारवाढीनंतर पाण्याचे व्यवस्थापन व नियोजन करण्यासाठी कारखान्याने काय उपाययोजना केल्या आहेत. | कारखाना चालू असतांना कारखाना चालविण्यासाठी जे पाणी लागणार आहे त्याचा पुनर्वापर केला जातो. त्यानंतर ऊस गाळप कारतेवेळेस ७० % पाणी निघते, त्यापैकी ८५ ते ९० % पाणी हे परत कारखाना प्रोसेस साठी वापर करणार आहोत. तसेच १० ते १५ % जास्तीचे निघणारे पाणी ( Excess Condensate ) १६०९ घन मीटर प्रति दिनी इतके पाणी पुनर्वापर करूनहि शिल्लक राहणार आहे.<br>कारखान्यात पाणी तिथे लागणार जे पिण्यासाठी आणि बॉयलर मध्ये वाफ तयार करणे व ती वाफ पुन्हा पाण्यात रूपांतर होते, त्या प्रक्रियेमध्ये साधारतः ४ त ५ % पाण्याचा नाश होतो.<br>त्यामुळे कारखाना चालू असतांना फक्त १८२ घन मीटर प्रति दिनी इतकेच पाणी लागणार आहे. |

**९. श्री. विक्रम जगताप , मु.पोस्ट.- पणदरे ता. बारामती, जिल्हा - पुणे.**

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ९ | कारखाना व ई.टी.पी. प्रक्रिया साठी जे रासायनिक घटक वापरतात आणि त्या प्रक्रिया मधून निघणाऱ्या ऑरगॅनिक व इनऑरगॅनिक घटकांचा विचार करतो का ? जेणे करून पर्यावरणाचे रक्षण होईल. | ऑरगॅनिक व इनऑरगॅनिक जसे सी.ओ.डी., बी.ओ.डी. आणि टी.डी.एस. याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या मार्गदर्शक / सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार आपण सांडपाण्यावर प्रक्रिया करून सोडणार आहोत.<br>तसेच कारखान्याने ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टिम बसवलेली आहे, त्यामध्ये कारखाना ई.टी.पी. मधून प्रक्रिया झालेले पाण्याचे जे काही प्रदूषके आहेत (सी.ओ.डी., बी.ओ.डी., टी.डी.एस., टी.एस.एस.) ते केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना दिसते व ते सी.पी.सी.बी. व एम.पी.सी.बी. यांच्या निकषाप्रमाणे आहे कि नाही ते कळते. जर प्रदूषके काही प्रमाणात जास्त झाली. |

| | | |
|---|---|---|
| | | तर सी.पी.सी.बी. व एम.पी.सी.बी. यांच्या मार्फत ई.मेल व एस.एम.एस. अलर्ट येते. त्यामुळे कारखान्यातून निर्माण होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाणी हे सी.पी.सी.बी. व एम.पी.सी.बी.यांच्या निकषाप्रमाणे असते, त्याची ऑनलाईन तपासणी हि यंत्रणेमार्फत केली जाते. |

१०. श्री. कोकरे मु.पोस्ट – धुमाळवाडी, ता.बारामती, जिल्हा – पुणे.

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| १० | आपल्या कारखान्याकडे उपलब्ध जमीन १७९ एकर आहे, तर त्या उपलबध जमिनीच्या ३३ % हरितपट्टा पाहिजे कि, कारखाना बांधकाम केलेल्या ३५ एकर च्या ३३ % हरितपट्टा पाहिजे. | कारखान्याकडे सध्या उपलब्ध जमीन १७९ एकर आहे. सदर जमिनीवर कारखाना हा ३५ एकर मध्ये बांधकाम झाले आहे. सदर बांधकामाच्या ३३ % म्हणजे १२ एकर हरितपट्टा पाहिजे. तसेच कारखान्याकडे राहिलेली जमीन १४४ एकर मध्ये कारखाना कामगार वसाहत, मराठी शाळा, विद्यालय व महाविद्यालय, मंगलकार्यालय, भविष्यातील विस्तारवाढीकरिता, इ. साठी आहे. |

११. श्री. शिवाजी रामचंद्र सस्ते मु.पोस्ट. पाहुणेवाडी, ता. बारामती, जिल्हा – पुणे.

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| ११ | शेतकऱ्यांसाठी काही नवीन उपाययोजना करणार आहेत का ? | शेतकऱ्यांसाठी कारखान्याने संजीवनी शेंद्रीय खत प्रकल्प, शिवतीर्थ मंगल कार्यालय, शैक्षणिक संस्था, शेतकऱ्यांसाठी वेळोवेळी शेतीविषयक मार्गदर्शन शिबीर, आरोग्य शिबीर, इ. प्रकारचे उपाययोजना आतापर्यंत चालू आहे व भविष्यात ते तसेच चालू राहणार आहे.<br>तसेच कारखान्याने उद्योग समूहाची सामाजिक जवाबदारी ( सी.एस.आर.) म्हणून भविष्यात जे कामे करण्याची आहेत त्यासाठी कारखान्याने ४७९ लाख रुपये पुढील पाच वर्षांसाठी राखून ठेवले आहे. त्यामुळे शेतकरी, सभासद, स्थानिकांसाठी व कामगारांसाठी या राखून ठेवलेल्या फंडातून उपाययोजना व सुविधा पुरविल्या जाणार आहेत. |

१२. श्री. विक्रम जगताप , मु.पोस्ट.- पणदरे ता. बारामती, जिल्हा – पुणे.

| अनु.क्र. | प्रश्न/आक्षेप /सूचना | प्रकल्प प्रवर्तकांचे प्रश्नास/ आक्षेपास / सूचनेस उत्तर |
|---|---|---|
| १२ | ऊस पाचट कुट्टी मशीन ( सयंत्र ) सभासद व शेतकऱ्यांसाठी कारखान्याने पुरवावे. | ऊस लागण हंगामानुसार प्रति एकरी ३ ते ५ मे टन पाचट ऊस तोड झाल्यानंतर शेतात उपलब्ध होते. सदर पाचटाचे खोडवा पिकामध्ये व्यवस्थित व्यवस्थापन केल्यास पाण्याची बचत ५० % पर्यंत होते. सध्या ऊस उत्पादक शेतकरी खोडवा पिकात पाचट ठेवतांना पाचट कुट्टी ट्रॅक्टर मशीन द्वारे करण्याकडे कल दिसून येत आहे. परंतु पाचट कुट्टी ट्रॅक्टर च्या साह्याने करत असतांना जमिनीमध्ये ओलावा असल्यामुळे जमिनीचे संपूर्ण फुल (सुपीकता) बिघडते तसेच शेतकऱ्यांचा काळ पाचट कुट्टी चांगली व्हावी म्हणून ट्रॅक्टर मुळे खूप मोठ्या प्रमाणात शेत / रान तुडविले जाते. म्हणजेच शेताचे झाले तयार होते, त्यामुळे उगवणारा खोडवा ऊस जोमदार येत नाही. तसेच सदर खोडव्यास पहिले पाणी दिले असता जमिनीत पाणी त्वरित न मुरल्यामुळे खोडवा पीक पिवळे पडते.<br>त्यामुळे तुटलेल्या उसाचा खोडवा ठेवताना पाचट कुट्टी न करतांना उसाच्या बुडखावरील पाचट सारी / पाण्यामध्ये व्यवस्तीत रचून घ्यावे. प्रत्यक्ष पाहणी अंती पाचट कुट्टी न केलेल्या खोडवा पिकास खोडकीड लागत नाही. सध्या दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे शेतकऱ्यांनी पाचटाचा अच्छदानासाठी वापर करावा. त्यामुळे पाण्याची बचतीबरोबर जमिनीची जैविक सुपीकता वाढवण्यास मदत होते. या सर्व कारणामुळे कारखाना पाचट कुट्टी मशीन न वापरण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्याची शास्त्रीय माहिती मिळवून, पाचट योग्यप्रकारे राखण्याचे मार्गदर्शन मिळते. |

पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीने उपस्थितांना प्रकल्प विस्तारिकरणामुळे पर्यावरण सरंक्षणाबाबत त्यांच्या काही सूचना वा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी हैद्राबादहून ईमेलवर सूचना पाठविणा-या व येथे उपस्थित असणेबाबत कळविणा-या पर्यावरणवादी यांना ते उपस्थित असल्यास त्यांना त्यांच्या काही सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. त्याबाबत उपस्थितांकडून कुठलीही प्रतिक्रिया आली नाही. पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीने प्रकल्प प्रवर्तकांना व पर्यावरण सल्लागारांना संबंधित सूचना वा आक्षेप यांना परस्पर उत्तरे देऊन त्याची प्रत समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी

समिती यांच्या कार्यालयात सादर करण्याचे आदेश दिले. सदरहू आक्षेप, सूचना व त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे ही बैठकीच्या इतिवृतान्तबरोबर शासनास पाठविण्यात येईल अशी माहिती दिली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सादरीकरण करतेवेळी त्यांनी काही उपाययोजना / सूचना सुचविल्या :-

- कारखान्याने जी पोल्युशन कंट्रोल सिस्टिम बसवलेली आहे, त्याचे इंटर लॉकिंग केले तर फायद्याचे होईल, जेव्हा पोल्युशन कंट्रोल सिस्टीम बंद राहील तेव्हा कारखान्याकडे जी प्रक्रिया यंत्रणा आहे, ती आपोआप बंद झाली पाहिजे असे करणे शक्य असेल तर कारखान्याने करावे.
- सध्या जमीन हि अल्कलाईन होत चाललेली आहे असे दिसते, त्यासाठी कारखान्याने ऑरगॅनिक / जैविक खते सभासद व शेतकयासाठी पुरवठा केला तर जमिनीचा सामू आपण नियंत्रणात ठेवता येईल.
- हा कारखाना विस्तार करतोय तर कारखान्याकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कारखान्याकडून अपेक्षा करते कि, त्यांनी अपारंपरिक स्त्रोत जसे पवन ऊर्जा, सौर उर्जा यांचा वापर करून महाराष्ट्रातील कारखान्यापुढे एक आदर्श मॉडेल म्हणून प्रस्तुत केले तर आपले स्वागतच आहे.

वरिल मुद्द्यांवर पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीने आपसात चर्चा करुन शासनास अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात वरिल मुद्द्यांवर स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना माहिती दिली की बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून बैठकीच्या इतिवृतान्तात त्याचा अंतर्भाव करण्यात येईल व सदरहू इतिवृत्त हे शासनास अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत सादर करण्यात येईल. बैठकीत पुढील काही सूचना नसल्याने सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीयांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना बैठकीच समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे उपस्थित होणा-या मुद्द्यावर मत प्रदर्शित केले की -

- कारखान्याने सी.एस.आर. फंडातून जास्तीत जास्त शेतकरी व सभासदांना फायदा व विकास करावा.
- कारखाना विस्तारवाढीनंतर जो काही रोजगार निर्माण होईल त्यामध्ये स्थानिक कामगार यांना प्राधान्य द्यावे, तसेच स्थानिक कामगारांसाठी तांत्रिक प्रशिक्षण देऊन त्यांना कारखान्यात रोजगार द्यावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी माहिती दिली की सदरहू बैठकीस ८० व्यक्ती उपस्थित आहेत, त्यात स्थानिकांबरोबरच प्रकल्प प्रवर्तक, शासकीय अधिकारी यांचा समावेश आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना माहिती दिली की बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून बैठकीच्या इतिवृतान्तात त्याचा अंतर्भाव करण्यात येईल व सदरहू इतिवृत्त हे शासनाला सादर अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत महाराष्ट्र शासनाला सादर करण्यात येईल. तज्ञ समिती याबाबत निर्णय घेईल. त्यांनी प्रकल्प प्रवर्तक व प्रकल्प पर्यावरण सल्लागारांना अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात उपस्थित केलेल्या सूचनांचा अंतर्भाव करण्याचे आदेश दिले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठक संपन्न झाल्याची उद्घोषणा केली. अध्यक्षांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

**(नितीन शिंदे)**
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१,
मप्रनि मंडळ,पुणे.

**(सौ.जयश्री कटारे)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा -पुणे